# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** दिनांक - २५/०९/२०२४

## गोरेगांव, माहिम परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाईत २२ किलो 'गांजा' व २१४ ग्रॅम एम.डी.(मेफेड्रॉन) अंदाजे किं.रू.५१ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करत परकीय नागरीकासह दोन ड्रग्ज तस्करांना केले जेरबंद.

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) गु.र.क्र. ५५/२०२४, कलम ८ (क) सह २० (क) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(कांदिवली युनिट)**<br>२) गु.र.क्र. ५६/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ **(वरळी युनिट)** |
| **दाखल दिनांक** | दिनांक २४/०९/२०२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) गोरेगांव, मुंबई, २) माहिम मुंबई |
| **आरोपी संख्या** | एकूण ०२ आरोपी. |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण २२ किलो वजनाचा गांजा अं.किं. रूपये ८.८ लाख रूपये /-<br>२) एकुण २१४ ग्रॅम एम.डी.(मेफेड्रॉन) अंदाजे किंमत रू. ४२.२ लाखापेक्षा अधिक किंमत अशी एकूण ५१ लाख रूपयांपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त. |

### (१) गोरेगांव, मुंबई परिसरातून २२ किलो वजनाचा 'गांजा' जप्त -

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे कांदिवली युनिटने दिनांक २३/०९/२०२४ रोजी गोरेगांव, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे 'गांजा' विक्री करणाऱ्या इसमास ताब्यात घेतले. आरोपीचे ताब्यातून एकूण २२ किलो वजनाचा 'गांजा' किंमत अंदाजे रुपये ९ लाख रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद गुन्हयाचा पुढील तपास कांदिवली युनिट करत आहे.

### (२) माहिम, मुंबई परिसरातून २१४ ग्रॅम वजनाचा 'एम.डी. (मेफेड्रॉन)' जप्त -

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे बांद्रा युनिटने दिनांक २४/०९/२०२४ रोजी माहिम, मुंबई परिसरात गस्तीदरम्यान अवैधपणे एम.डी. (मेफेड्रॉन) विक्री करणाऱ्या एका परकीय नागरिकांस ताब्यात घेतले. नमुद आरोपींचे ताब्यातून ११० ग्रॅम तपकीरी रंगाचा एम.डी. व १०४ ग्रॅम सफेद रंगाचा एम.डी. असा एकूण २१४ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) किंमत अंदाजे रूपये ४२.२ लाख रूपये पेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. नमूद गुन्हयाचा पुढील तपास वरळी युनिट करत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, कांदीवली युनिटचे प्रभारी पो.नि.श्री.वैभव धुमाळ, वरळी युनिटचे प्र.पो.नि. श्री. संतोष साळुंखे यांचे नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

--/--